आषाढ श्रावण

पोपटी हिरव्या पायघड्यावरुनी
आला श्रावण हा सृजन
सणांमध्ये अग्रणी असे जिवंतिका पूजन
बाळासाठी आई करते प्रार्थना मनोमन ------

रिमझिम पाऊसान
चिंब भिजत आणि नागपंचमी
प्रसन्न करण्यास नागराजाला
दूध, लाही, शिरा ठेवूया प्रसाद म्हणूनी ----

भगवान शंकराला प्रिय असती
श्रावणातील सगळे सोमवार
तांदूळ, मूग, तीळ अन जवसाची
शिवामूठ वाहूनी भक्ती करू त्रिवार ------

मंगळागौर जागविण्यास
आली सासरहून लाडकी लेक
सौभाग्यासाठी करुनी व्रत
जागरण करुनी खेळ खेळुनी अनेक -------

घरगुती सणसमारंभामध्येच
लागते राष्ट्रीय सणांची हजेरी
१५ ऑगस्टला तिरंगा फडकतो डौलात
सजते दिमाखात सरकारी कार्यालय कचेरी ------

लाटेवरती स्वार असतो उदरनिर्वाहाचा भार
नारळ अर्पुनी म्हणूनी ठेविती जाण
कोळीवाड्याचा आनंदउत्सव दर्यासंगे
नारळी पौर्णिमेस रंगतो छान --------

प्रेमाने ओवाळून बांधते
बहीण राखी प्रिय भाऊरायास
आगळी वेगळी रेशिमगांठ ती
स्नेहबंधाने जुळविते हृदयास खास ----

P.T.O.


②

अष्टमीस काळ्या सावळ्या रात्री
वर्षाराणीसह ढगांच्या पालखीतून
अवतरले बाळरूपात श्रीकृष्ण भगवान
अवघ्या कारागृहास दिले भेदूनी
दहीहंडी फोडूनी, गोपाळकाला करूनी
कृष्णजयंतीस जाती सारे आनंदूनी ..........

राबतो रात्रंदिवस शेतात
ढवळ्या पवळ्या कृषिमित्रांसाठी
कृतज्ञतेपोटी खास 'पोळा' हा सण
असतो बैलांच्या विश्रांतीसाठी
पुरणपोळी नैवेद्यास, अंगावरती
हार फुलांच्या माळा, झूल शोभते पाठी ......

अशी सणावळी घेऊन
आषाढ श्रावण वाढवितो वैभव वसुंधरेचे
सप्रेमे सहभागी होताच त्यात
उल्हासिते तनमन धरतीवरील मानवाचे !! ......

सौ. विनया पुरुषोत्तम जोशी.



व्हिडिओ पहा